दै. सत्यप्रभा दि. 10.07.2023

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

सत्यप्रभा दि 10/07/2023

**नांदेड, दि.९ :** मुखेड तालुक्यातील मंग्याळ येथे कृष्णा भोसले यास घरातून उचलून नेवून बेदम मारहाण केल्याची घटना २२ जून ला घडली होती. या मारहाणीत मृत्यू झालेल्या कृष्णा भोसलेचा मारेकरी घटनेनंतर फरार झाला. त्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी लोहा येथील शिवाजी चौकातून अटक केली आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुखेड तालुक्यातील मंग्याळ येथील शामराव भोसले यांनी मुखेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली की, त्यांचा भाउ कृष्णा भोसले यास पिंटू उर्फ छत्रपती रामा भोसले रा. लोहा याने घरातून उचलून नेवून बेदम मारहाणा केल्याने कृष्णा भोसले यांचा मारहाणीत मृत्यू झाला. या पकरणी मुखेड पोलिसात आरोपीविरुध्द कलम ३०२, ३६४, ३४२, ३२४, २३४, १४३, १४७, १४८, १४९, ५०६, भादंवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच आरोपी पिंटू भोसले हा घटनास्थळावरून फरार झाला. दरम्यान खुनाच्या या घटनेतील आरोपीला पकडण्याचे आदेशा जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना दिल्यानंतर आरोपीच्या मागावर पो. नि. द्वारकादास चिखलीकर यांच्या नेतृत्वात पथक रवाना झाले. सदर गुन्ह्यातील आरोपी पिंटू भोसले हा लोहा येथील शिवाजी चौकात असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाल्यानंतर स्थागुशा पथकाने सापळा लावून आरोपीस ताब्यात घेतले व त्याची सखोल चौकशी केली असता, पिंटू उर्फ छत्रपती भोसले याने आपणच कृष्णा भोसले यास मारले असल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यास अटक करून मुखेड पोलिसांच्या ताब्यात दिले असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

दै. तरुण भारत दि. 10/07/2023

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक

तरुण भारत दि 10/07/2023

तभा वृत्तसेवा

**नांदेड, ९ जूलै -**

खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी पिंटू उर्फ छत्रपती रामा भोसले यास स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

मुखेड येथे दि.२२ जून रोजी कृष्णा भोसले यास आरोपी पिंटू उर्फ छत्रपती रामा भोसले रा.लोहा याने घरातून उचलून नेवून त्यास मारहाण केली. त्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी शामराव भोसले रा.मंग्याळ ता.मुखेड याने दिलेल्या फिर्यादीनुसार मुखेड पोलिसांनी भादंविच्या कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला होता. यातील फरार आरोपी लोहा येथे असल्याची गोपनिय माहिती करुन स्थागुशाचे एक पथक लोहा येथे रवाना करण्यात आले. पथकाने आरोपी पिंटू उर्फ छत्रपती रामा भोसले यास अटक केली. त्याने सदरचा खुन केल्याची कबुली दिली. त्यास अटक करुन मुखेड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, पोलीस उपनिरीक्षक सचिन सोनवणे, पोहेकॉ गुंडेराव करले, अफजल पठाण, देवा चव्हाण, राजु सिटीकर, दिपक ओढणे, संजीव जिंकलवाड, विठ्ठल शेळके, शंकर केंद्रे यांच्या पथकाने केली.